# रत्नागिरी येथील ज्यादा सह जिल्हा न्यायाधीश व अतिरीक्त सत्र न्यायाधीश यांचे न्यायालयात

## विशेष खटला क्र.२२/२०२२

**(सीएनआर नं. MHRT010007182022)**

| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र सरकार | - | फिर्यादी. |
| विरुद्ध | | |
| समीर मोहन हरमले | - | आरोपी/अर्जदार. |

## निशाणी क्रमांक २१ वरील आदेश

(दि.१०/०१/२०२३ रोजी खुल्या न्यायालयात जाहिर केला.)

भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३७६, ३७६(फ), ३७६(३), ५०६ व बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ४, ८, १२ अन्वये देवरुख पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १३९/२०२२ मध्ये फिर्यादीने दिलेल्या प्रथम खबरी अहवालानुसार आरोपी/अर्जदार हा न्यायालयीन कोठडीत असल्याने त्याने स्वतःची जामिनावर मुक्तता व्हावी अशा निर्देशाकरिता सदरचा दुसरा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३९ अन्वये केला आहे.

२. आरोपी/अर्जदार तर्फे वकील श्री. एफ.एम.शेख व शासनाचा अभियोग पक्ष तथा अन्वेषक अधिका-यांतर्फे अतिरीक्त सरकारी विधीज्ञ श्री. एन.व्ही.कानिटकर

यांचे विवेचन ऐकले. अन्वेषण अधिकारी यांनी अर्जास विरोध दर्शविणारे म्हणणे (नि.२३) दाखल केले. सदर अर्जाची नोटीस फिर्यादीस देण्यात आली. फिर्यादीने देखील हजर राहून आपले म्हणणे (नि.२४) दाखल करुन आरोपीच्या जामीन अर्जास विरोध दर्शविला आहे.

३. गुन्हयाचा तपशील असा आहे -

पीडीतेची जन्मतारीख दिनांक २५/०९/२००४ आहे. फिर्याद देतानाच्यावेळी तिचे वय १७ वर्षे ११ महिने १७ दिवस असे होते. फिर्यादी, पीडीता व आरोपी/अर्जदार हे एकाच घरात राहणारे असून ते एकमेकांची चुलत भावंडे आहेत. फिर्यादी इयत्ता बारावीत शिकते. दिनांक २८/०८/२०२२ ते दिनांक ०६/०९/२०२२ गणपतीची सुट्टी असल्याने फिर्यादी, आरोपी/अर्जदार व घरातील इतर सर्व माणसे घरातच होती. दिनांक ०२/०९/२०२२ रोजी देवळे येथे बैलगाडीची शर्यत होती. त्या शर्यतीसाठी तिचे दुसरे काका मनोहर यांचीही बैलगाडी गेली होती व ती सर्व माणसे टेंपोतून देवळे येथे गेली होती. पीडीता, तिचा सख्खा भाऊ रुतीक व आरोपी/अर्जदार हे मागे थांबले होते व त्यांनी मोटार सायकलने देवळे येथे जायचे ठरवले. दुपारी १२.१५ वाजता हे तिघेजण आरोपीच्या मोटार सायकलने निघाले. बोरुले येथे आल्यावर आपण तिघेजण असल्याने आपल्याला पोलीस पकडतील असे सांगून त्याने रुतीकला बोरुले स्टॉप येथे थांबवून पीडीतेला मोटार सायकलवर बसवून देवळे जंगलवाडी येथे आणले व तिला तेथे उभे राहण्यास सांगून रुतीकला घेवून येतो असे सांगून गेला व रुतीकला देवळे येथे शर्यतीचे ठिकाणी सोडून पीडीता उभी असलेल्या ठिकाणी परत आला. शर्यत सुरु होण्यास वेळ आहे, आपण आंब्याची बाग बघूया असे त्याने फिर्यादीला सांगितले. फिर्यादी शर्यत पाहायला जावूया म्हणत होती परंतु त्याने तिला जंगलवाडी स्टॉप येथून कच्चा रस्त्याने एका आंब्याच्या बागेत दुपारी दीड वाजता आणले व तेथे असलेल्या छोट्या घराचे कुलूप त्याने त्याच्याकडील चावीने उघडले व पीडीतेला आत खेचून तिच्याशी जबरदस्तीने शरीरसंबंध केला. ती खूप ओरडली परंतु तेथे कोणीही मदतीला आले नाही. आरोपीने तिला कोणाला काही सांगितलेस तर मारुन टाकेन असे धमकावल्याने तिने घाबरुन ही घटना

कोणालाही सांगितली नाही. दिनांक ०५/०९/२०२२ रोजी तिने याच विचारात रात्री ११.०० वाजता घरात असलेले उंदीर मारण्याचे औषध खाल्ले. तिला तिच्या भावाने व वडीलांनी प्रथम लांजा ग्रामीण रुग्णालय नंतर सिव्हील हॉस्पीटल रत्नागिरी येथे नेले. तेथे पोलीसांनी तिचा जबाब नोंदविला. परंतु आरोपीने धमकावले असल्याने तेथेही तिने कोणत्यातरी विचारात औषध खाल्ले असे सांगितले. तेथून तिला सीपीआर हॉस्पीटल कोल्हापूर येथे नेले. नंतर तिने आरोपी/अर्जदार विरुद्ध फिर्याद दाखल केली.

४. सदर गुन्हयात आरोपीस दिनांक १३/०९/२०२२ रोजी अटक करण्यात आली. तेव्हापासून आजतागायत तो गजाआड आहे.

५. आरोपीच्या वकीलांच्या युक्तिवादानुसार आरोपी/अर्जदार निर्दोष आहे. त्याची व फिर्यादीच्या आईची वाकडीक असून केवळ खोटेपणाने सदर केस दाखल केली आहे. आरोपी/अर्जदार कोठेही फरारी होणार नाही व न्यायालयाने घातलेल्या सर्व अटी व शर्तींचे पालन करेल. तरी त्याला जामीन मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली. पीडीतेच्या वैद्यकीय प्रमाणपत्रात कोणत्याही जखमा तिच्या शरीरावर आढळल्या नाहीत. केवळ द्वेषाने व असूयेने सदरची केस दाखल केली आहे. आरोपीच्या वकीलांनी असाही युक्तिवाद केला की आरोपी हा महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करीत असल्याने याचा विचार सहानुभूतीपूर्वक व्हावा.

६. सरकारी वकीलांच्या युक्तिवादानुसार आरोपीने गंभीर गुन्हा केला आहे. तो जामीनावर सुटल्यास फिर्यादी व साक्षीदारांना धमकावेल तसेच फरारी होईल. तरी त्याला जामीन मंजूर करु नये अशी विनंती केली.

७. दोषारोपपत्रातील कागदपत्र वाचले. सदर गुन्ह्यामधील फिर्यादी ही फिर्याद देताना १७ वर्षे ११ महिने १७ दिवस वयाची आहे. असे जरी म्हटले तरीसुद्धा ह्या गुन्ह्यातील घटना ही संमतीवर अधारीत नाही. अन्वेषक अधिका-याच्या

तपासानुसार आरोपीने जबरदस्तीने पीडीतेशी शरीरसंबंध केला होता. अर्थातच फिर्यादीचे वय समजुतीचे आहे किंवा कसे हा प्रश्न या ठिकाणी गौण आहे.

८. दोषारोपपत्र पाहिले असता असेही स्पष्ट होते की, आरोपी/अर्जदार हा पीडीतेचा सख्खा चुलत भाऊ आहे. त्याने रुतीक याला प्रथम शर्यतीच्या ठिकाणी सोडून पीडीतेला जाणीवपूर्वक एकांतात एका आंब्याच्या बागेत नेले व तेथील एका छोट्या घराजवळ जावून स्वतःजवळच्या चावीने घराचे दार उघडून त्या ठिकाणी जबदरस्तीने संबंध प्रस्थापित केले होते. अर्थातच सदर प्रसंग हा आरोपीने ठरवून केलेला आहे. याबाबत पीडीतेची फिर्याद लक्षात घेतली असता असेही स्पष्ट होते की या प्रकारानंतर तिला आरोपीने धमकी दिली होती. तिच्यासोबत आरोपीने केलेल्या प्रकारामुळे त्याच विचारामध्ये तिने दिनांक ०५/०९/२०२२ रोजी रात्री अकरा वाजता उंदीर मारण्याचे औषध खावून आत्महत्या करण्याचा प्रयत्न सुद्धा केला. फिर्यादीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६४ नुसारचा जबाब देखील दिनांक ११/०९/२०२२ रोजी न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग देवरुख यांनी नोंदवल्याचे दिसते. सदरच्या जबाबातही तिने फिर्यादीप्रमाणे माहिती दिली. घटनास्थळावर असलेली आंबा बाग आणि त्यातील घर याबाबत देखील अन्वेषक अधिका-याने तपास करुन ही बाग नजीर महंमद खतीब या आंबा व्यापा-याची असल्याचे स्पष्ट केले आहे. या इसमाच्या टिपणाप्रमाणे त्याने ही बाग व घराची चावी आरोपीच्या वडिलांकडे दिल्याची माहिती पोलीसांना दिली आहे.

९. आरोपी/अर्जदार यास जामीन मंजूर न होण्याची कारणे अन्वेषक अधिका-याने नि.२३ कडील म्हणण्यात नमूद केली. दोषरोपपत्र न्यायालयात दाखल झाले आहे व आरोपी/अर्जदार जामीनावर सुटल्यास फिर्यादी व व साक्षीदार यांचेवर हस्ते परहस्ते दबाव टाकण्याची शक्यता आहे. फिर्यादी व आरोपी/अर्जदार हे एकाच घरात राहतात व एकमेकांचे नातेवाईक आहेत. त्यामुळे आरोपी/अर्जदार जामीनावर सुटल्यास तो फिर्यादी व साक्षीदारांवर नक्की दबाव आणू शकतो हे संयुक्तिक वाटते. पीडीतेने या न्यायालयासमोर दाखल केलेले नि.२४ कडील म्हणणेसुद्धा अशाच

स्वरुपाचे आहे. पोलीसांचे म्हणणे व फिर्यादीचे म्हणणे पाहता आरोपीला जामीन मंजूर झाल्यास फिर्यादी व तिच्या कुटुंबाच्या जिवाला धोका आहे हे ही संयुक्तिक वाटते. आरोपीवर दाखल असलेला गुन्हा गंभीर आहे. फिर्यादी व आरोपी/अर्जदार यांचे नाते लक्षात घेता गुन्ह्याचे गांभीर्य वाढते. सबब, या आरोपीला जामीन मंजूर करु नये अशा निष्कर्षास हे न्यायालय पोहोचते. सबब, खालील हुकुम करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. वरील आदेश सर्व संबंधितांना कळविण्यात यावा.

दि.१०/०१/२०२३

**(व्ही.ए.राऊत)**
ज्यादा सह जिल्हा न्यायाधीश व
अतिरीक्त सत्र न्यायाधीश रत्नागिरी.

## - : C E R T I F I C A T E : -

**Order Below Exh.21 in Special Case No.22/2022.**

I affirm that the contents of this PDF file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Smt. A. U. Sayyed. |
| Court Name | :- | The Court of Extra Joint District Judge & Addl. Sessions Judge, Ratnagiri (POCSO Court) |
| Date of decision | :- | 10/01/2023. |
| Judgment signed by P.O. on | :- | 11/01/2023. |
| Judgment uploaded on | :- | 11/01/2023. |